Volume-2 (2021)
Special Issue-1

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय चळवळ आणि राजकीय पक्षांची स्थापना

**डॉ.ज्योती रामराव रामोड**
इतिहास विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद
9673774269
jr9673774269@gmail.com

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येक क्षेत्रातील कार्य अतूलनीय आणि वैशिष्टयपूर्ण आहे. ज्या प्रमाणे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, संविधानिक कार्यात योगदान आहे. त्याच्यप्रमाणे राजकीय क्षेत्रातही अत्यंत महत्वपूर्ण भूमिका डॉ. आंबेडकरांची दिसून येते. मी जरी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही असे मत डॉ. आंबेडकरांचे होते आणि त्यानुसार समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा या हेतूने प्रत्येक कार्य केले होते. समता-एकात्मता-बंधूता, एक मेकाबाबात सहकार्याची भावना ही तत्वे तरूणांच्या मनात रूजवण्याच्या दृष्टिने राजकीय वाटचाल डॉ. आंबेडकरांनी केली होती.

समाजातील खालच्या स्तरापासून जर प्रगती साधायची असेल तर त्याला राजकीय आधार असणे अत्यंत महत्वाचे आहे. राजकीय चळवळ सामाजिक आश्रयाशिवाय यशस्वी होणे शक्य नाही. राजकीय सत्ता ज्या वेळेस एकवटली जाते तेव्हा काही निकष ठरवून त्यातूनच राजकीय पाया भक्कम केला जातो. समाजात विषमता आहे ती दूर करून एकात्मता व समता निर्माण करण्यासाठी राजकीय मार्गदर्शक तत्वे ठरवून तीची बीजे येणा-या पिढीसाठी पेरली तर निर्माण होणारा समाज एकात्मिक व विकसित स्वरूपाचा असेल. डॉ. बाबासाहेब आंबबेडकर यांनी आपल्या राजकीय कार्यात विविध चळवळी अतिशय संघर्षाने पार पाडल्या.

डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय चळवळीचा आढावा खालीलप्रमाणे आपण घेवूया.

**1. साऊथबरो कमिटी :-**

राजकीय हक्क देण्यासाठी ब्रिटीश सरकारने लॉड साऊथ ब्युरोचा अध्यक्षतेखाली मतदान कमिटी भारतात 1919 मध्ये पाठवली. अस्पृश्यांच्या अधिकारासाठी डॉ. आंबेडकरांची निवड सरकारने केली होती. तेथूनच राजकीय चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. या मतदानात बाबासाहेबांनी, मतदानाचा हक्क, उमेदरवारीचा हक्क, अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.

डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाला 'राजकीय सत्तेच्या मोक्याच्या जागा आणि महत्त्वाची पदे काबीज करा तसेच राजकर्ती जमात बना असा संदेश दिला. यातून राजकीय पाया हळूहळू भक्कम करत समाजाला संघटित करण्याचे कार्य केले. समाजविकासाची चौकट बदलत गेली.

**2. अस्पृश्यांचा हक्काचा जाहिरनामा : -**

या जाहिर नाम्याच्या सहाय्याने राजकीय क्षेत्रात अस्पृश्यांना स्वतंत्रता व समता मिळावी यासाठी काही तरतूदीची मागणी डॉ. आंबेडकरांनी केली होती. 1927 मध्ये ब्रिटीश सरकारने सायमन कमिशन भारतात आले. त्यात

डॉ. आंबेडकरांनी एक अस्पृश्यांच्या हक्कासंबंधी तर दूसरा मुंबई प्रांतात कोणते राजकीय हक्क असावेत असे दोन खलिते समितीला पाठवले. सायमन कमिशनने अस्पृश्यांना राजजकीय हक्क द्यावेत अशी शिफारस केली. 19 मार्च 1928 रोजी मुंबई कायदेमंडळात 'महार वतन बील' मांडले. महारांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी हे बील मांडण्यात आले. महारांना त्यांच्या इच्छेप्रमाणे काम व वेतन ठरवण्याचा अधिकार द्यावा अशी मागणी करण्यात आली.

या जाहिरनाम्याच्या मदतीने मानवहिताला धरून महारांना सर्वसामान्या-प्रमाणे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केली.

**3. गोलमेज परिषद : -**

ज्यावेळी सायमन कमिशन निष्फळ ठरले त्यानंतर गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले. ही गोलमेज परिषद लंडन येथे घेण्यात आली. 1930 साली पहिली 1931 साली दुसरी आणि 1932 साली तिसरी गोलमेज परिषद लंडन येथे भरवण्यात आली होती. या परिषदेमध्ये स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीवरून डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात मतभेद झाले आणि या मागणीला महात्मा गांधी यांनी विरोध केला.

विविध राजकीय स्तरांवर अस्पृश्यांच्या हक्कासाठी राजकीय बाजूने डॉ. आंबेडकर संघर्ष करत होते. समाजाची चौकट ठरलेली आहे. ती मोडून विकास घडवून आणण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

**4) पुणे करार : -**

भारतीय इतिहासात विशेष रुपाने प्रसिद्ध असलेला पुणे करार महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात 1932 साली पुणे येथे झाला. या करारानुसार स्वतंत्र्य मतदारसंघाऐवी संयुक्त मतदारसंघ व 18% जागा ठेवण्याचा निर्णय झाला. यातून राजकीय फायदा झाला. अस्पृश्यांना राजकारणात स्थान मिळण्यास सुरुवात झाली आणि वेगळे अस्तित्व निर्माण होण्यास मदत झाली.

अशा प्रकारच्या राजकीय चळवळीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय क्षेत्रात व्यापक आणि मौलिक स्वरुपाचे बदल घडवून आणले. या चळवळीतूनच खऱ्या अर्थाने राजकीय व सामाजिक विकास एकत्रित होण्यास सुरुवात झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय चळवळीतून प्रेरणा घेऊन आणि भावी काळात समतेचा विचार मांडणारे एकपक्षीय संघटन असावे म्हणून राजकीय पक्षाची स्थापना केली.

**अ. मजुर पक्ष स्थापना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1936 साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. हा पक्ष स्थापन करण्यामागे मजुरांना हक्क मिळावे व त्यांना गुलामगिरीतून मुक्तता मिळावी हा उद्देश्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत असे होते की, भांडवलशाही आणि ब्राह्मणशाही भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत. यासाठी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना करणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गरजेचे वाटले. या पक्षाच्या माध्यमातून कामगाराचे विविध प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला गेला.

मजुरांना त्यांच्या आवडीचे काम करण्याचा आणि वेतन ठरण्याचा अधिकार देण्यासाठी या पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यांतून आंबेडकरांची तळागाळापर्यंतच्या लोकांच्या विकासासाठी असलेली धडपड दिसून येते. या राजकीय चळवळीमुळे समाजात सकारात्मक बदल होताना दिसत होता. याच मजूर पक्षाने 1937 च्या निवडणुकामध्ये 13 जागा जिंकल्या होत्या.

**आ. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन : -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1942 साली या पक्षाची स्थापना केली होती. सर्वच जाती-धर्मातील लोकांना सामावून घेण्यासाठी एखादा नवा पक्ष असावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. या पक्षाच्या स्थापनेने अस्पृश्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे देशातील जाती-पोट जातीमध्ये वैचारिक अभिसरण व भावनिक एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. 1943 ला यांचे पहिले अधिवेशन कानपूर येथे झाले. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाचे राजकारण व सरकार चालवण्यास हिंदू, मुसलमान व दलित हे भागीदार असलेच पाहिजे. सर्वांना योग्य वाटा मिळालाच पाहिजे असा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता.

एकंदरीत या पक्षाच्या माध्यमातून राजकारणात दलितांचा समावेश असणे सरकार चालवण्यात त्यांचे मत विचारात घेतले पाहिजे असे केले तरच संपूर्ण समाजात एकात्मतेची भावना निर्माण होईल. एकमेकांना कमी लेखण्यापेक्षा एकमेकांच्या सहकार्याची भावना वाढण्यास मदत होईल. हा सर्व विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या पक्षाच्या माध्यमातून साद्य करण्याचा प्रयत्न केला.

**5) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया :-**

शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष बरखास्त करुन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना करण्याची कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. अशा सर्वसमावेशक पक्षाची स्थापना करण्यापुर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अकाली निधनामुळे ते शक्य झाले नाही. मात्र नंतर त्यांच्यात शोकमग्न अनुयायांनी 1957 ला या पक्षाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा त्यांच्या अनुयायांनी पूर्ण केली. या पक्षांच्या माध्यमातून सर्वांगीण विकासाचे ध्येय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते.

विविध राजकीय पक्षाच्या माध्यमातून ड़ॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची जाणीव होते. त्यांचे कार्य राजकीय क्षेत्रात नवतरुणांना प्रेरणा आणि मार्गदर्शन देणारे होते. शोषक न बनता आपल्या हक्कांसाठी लढा असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरंनी आपल्या राजकीय कार्यातून स्पष्ट केले.

**समारोप :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात मोठया प्ररमाणात राजकीय संघर्ष दिसून येतात. कोणत्याही संकटांना न डगमगता अगदी ताठपणे त्यांनी ती पार पाडली. राजकीय चळवळी घडवून आणण्यामागे प्रमुख हेतू समता आणि सर्वांसाठी समान तत्त्वे असली पाहिजे असा आग्रह होता. अस्पृश्यांना जागृत करुन आपल्या हक्कांसाठी लढा या त्यांच्या संदेशामुळे जागृती निर्माण झाली. अस्पृश्य समाजात नवचैतन्य निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे समाजाच्या विकासाला गती आणि नवी दिशा मिळण्यास मदत झाली. आपण एकसंघटित होऊन लढा दिला तरच हक्क मिळतील.

विविध चळवळीचे फलित म्हणजे वेगवेगळया रुपाच्या राजकीय पक्षाची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली आणि त्याद्वारे सर्वांना एकत्र केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय कार्यात जनतेने मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला. या पक्षाच्या मदतीने अस्पृश्यांना हक्काचे व्यासपीठ मिळाले. प्रश्न मांडण्याचे, हक्कासाठी संघटित होण्याची, समतेची मागणी करणे हे या पक्षाचे महत्त्वाचे उद्दिष्टे होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती उद्दिष्टे या राजकीय पक्षाच्या माध्यमातून पुर्णत्त्वास नेण्याचा प्रयत्न केला.

एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय क्षेत्रातील कार्य विस्तारीत आणि समाजाला विकसित रुप देणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

आंबेडकरांच्या कार्यकीर्दीतील राजकीय चळवळी व राजकीय पक्ष्ा यांतील त्यांचे योगदान संपूर्ण समाजासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे.

**संदर्भ ग्रंथसूची : -**

1. लुलेकर प्रल्हाद - अनंत पैलूचा सामाजिक योद्धा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सायन प्रकाशन, पुणे.
2. कांबळे तु.ली. - अनुयायी, शिल्पा प्रकाशन, नागपूर.
3. पंडीत नलिनी - आंबेडकर, ग्रंथाली प्रकाशन.
4. देशपांडे भ.द. - आंबेडकर यांचे राजकीय विचार, लोकवाङ्मयगृह, मुंबई.
5. मेणसे कृष्णा - आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई.
6. खरात शंकरराव - डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार, इंद्रायणी साहित्य, पुणे.
7. केळकर भा.कृ. - भारतभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे.